# सुस्वागतम

## महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१

### मधील महत्वाच्या तरतुदी

# रजेची सर्वसाधारण तत्वे

| | | |
|---|---|---|
| १. | रजा हक्क म्हणून मागता येत नाही | नियम १० |
| २. | रजा मंजूर करणारा सक्षम अधिकारी प्राधिकारी लोकसेवेच्या निकडीमुळे रजा नाकारु शकतो किंवा रद्द करु शकतो. | नियम १० |
| ३. | रजा मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्यास कर्मचाऱ्याने मागितलेल्या रजेचा प्रकार बदलता येत नाही. त्यासाठी कर्मचाऱ्याची लेखी विनंती असली पाहिजे. | नियम १० |

# रजेची सर्वसाधारण तत्वे

| | | |
|---|---|---|
| ४. | कर्मचारी सेवेत असताना त्याच्या विनंतीवरुन भूतलक्षी प्रभावाने एका प्रकारच्या रजेचे दुसऱ्या प्रकारच्या रजेत परिवर्तन करता येते. मात्र त्यावेळी तशी रजा अनुज्ञेय असली पाहिजे. रजेच्या परिवर्तनामुळे जादा देण्यात आलेल्या रकमेची वसुली केली जाते किंवा थकबाकीची रक्कम दिली जाते. | नियम ४ |

# रजेची सर्वसाधारण तत्वे

| | | |
|---|---|---|
| ५. | अनुपस्थितीचा कालावधी भुतलक्षी प्रभावाने असाधारण रजेत परिवर्तीत करता येतो. अशा प्रकारची रजा ही उपभोगण्यापुर्वी अर्ज करुन मंजूर करुन घेतली जात नाही. अनुपस्थिती नियमित करण्यासाठी ही रजा नंतर मंजूर केली जाते. | नियम ६३(६) |

# रजेची सर्वसाधारण तत्वे

| | | |
|---|---|---|
| ६. | कोणत्याही प्रकारची रजा सतत ५ वर्षाहून अधिक कालावधीकरीता मंजूर करता येत नाही. पुर्वी ५ वर्षे अनुपस्थित राहिल्यास नोकरी गमवावी लागत होती (BCSR) पण आता सलग रजा मंजुरीस प्रतिबंध | नियम १६ |

# रजेची सर्वसाधारण तत्वे

| | | |
|---|---|---|
| ७. | रजेच्या कालावधीत नोकरी किंवा व्यवसाय सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीशवाय स्वीकारता येत नाही. २४ तास सरकारी नोकर हे तत्व या मागे असल्याने अशी परवानगी सहसा मिळत नाही. | नियम १६ |

# रजेची सर्वसाधारण तत्वे

| | | |
|---|---|---|
| ८. | राजपत्रित कर्मचाऱ्यास शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याच्या वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे वैद्यकीय कारणास्तव रजा मंजुर करता येते. अराजपत्रित कर्मचाऱ्यांना नोंदणीकृत वैदयक व्यवसायीच्या वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे वैद्यकीय रजा मंजुर करता येते. | नियम ४० |

# रजेची सर्वसाधारण तत्वे

| | | |
|---|---|---|
| ९. | रजा मंजुर करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याला स्वेच्छा निर्णयानुसार दुसरे वैद्यकीय मत घेता येते. सामान्यत: रजेचा अर्ज आल्याबरोबर म्हणजे रजा चालू असताना ही कार्यवाही अपेक्षित. कर्मचारी परत हजर होताना ही कार्यवाही केली जाते व ती निरुपयोगी ठरते. | नियम ४१ |
| १०. | वैद्यकीय कारणास्तव रजेवर असलेल्या कर्मचाऱ्याने वैद्यकीय स्वास्थ्य प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्याला कामावर घेता येत नाही. | नियम ४७ |

# रजेची सर्वसाधारण तत्वे

| | | |
|---|---|---|
| ११. | रजा संपल्यानंतर कामावर अनुपस्थित राहिल्यास शिस्तभंगाची कार्यवाही | नियम ४८ |
| १२. | रजा संपण्याचा दिवस ते कामावर रुजू होण्याचा दिवस या दरम्यानचा संपूर्ण कालावधी (रविवार व सुट्टया धरुन) अनुपस्थितीचा काळ म्हणून धरण्यात येते. | नियम ४९ |

# रजेची सर्वसाधारण तत्वे

| | | |
|---|---|---|
| १३. | रजेच्या मागे किंवा पुढे जर सार्वजनिक सुट्ट्या असतील तर त्या जोडून घेता येतील. कार्यालयीन कामकाज करणाऱ्यांना ही सवलत मिळते पण Field मध्ये जर पर्यायी कर्मचारी उपलब्ध असेल तरच हा लाभ मिळेल. | |

# रजेची सर्वसाधारण तत्वे

| | | |
|---|---|---|
| १४. | राजीनाम्यामुळे कर्मचाऱ्याच्या शिल्लक रजेवरील हक्क सामान्यत: संपतो. परंतु सरकारी कर्मचाऱ्याने आपल्या पदाचा राजीनामा देवून शासनाच्या अन्य विभागास नामनिर्देशनाने नेमणूक स्वीकारल्यास तो राजीनामा तांत्रिक दृष्टया त्या पदाचा समजावा. शासकीय सेवेचा नाही त्यामुळे राजीनाम्याच्या दिवशी शिल्लक असलेली सर्व रजा नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हिशोबात घेण्यात यावी. | नियम २२ |

# रजेचे प्रकार

| देय व अनुज्ञेय रजा | विशेष रजा |
|---|---|
| १) अर्जित रजा - नियम ५० व ५१ | १) प्रसूति / गर्भपात रजा - नियम ७४ |
| २) अर्धवेतनी रजा - नियम ६० | २) विशेष विकलांगता रजा - नियम ७५ (हेतुपुरस्कर झालेल्या इजेबद्दल) |
| ३) परीवर्तीत रजा - नियम ६१ | ३) विशेष विकलांगता रजा - नियम ७६ (अपघाती इजेबद्दल) |
| ४) अनर्जित रजा - नियम ६२ | ४) रुग्णालयीन रजा - नियम ७७ |
| ५) असाधारण रजा - नियम ६३ | ५) खलाशांची रजा नियम ७८ |
| | ६) क्षयरोग / कर्करोग / कुष्ठरोग / पक्षघात रजा - नियम ७९ व परिशिष्ट -३ |
| | ७) अध्ययन रजा नियम |

टीप : अनु क्र. ३ व ४ हे ही अर्धवेतनी रजेचाच उप प्रकार आहे.

# देय व अनुज्ञेय रजेची वैशिष्टये
## (१) अर्जित रजा – नियम ५०

१. प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या जानेवारी आणि जुलै महिन्याच्या १ तारखेस प्रत्येकी १५ दिवस याप्रमाणे दोन हप्त्यांमध्ये ही रजा जमा केली जाते.

२. ही रजा ३०० दिवसांच्या कमाल मर्यादेपर्यंत साठविता येते. ३०० दिवस झाल्यावर पुढील सहामाहीच्या सुरुवातीला १५ दिवस अनुज्ञेय असतात पण, ३०० + १५ असे दाखवावे व घेतलेली रजा प्रथम १५ दिवसातुन वजा करावीच ३०० पेक्षा जास्त शिल्लक राहिलले दिवस व्यपगत होतील. मात्र एकाच वेळी सलग १८० दिवसापर्यंत ही रजा मंजुर करता येते.

# देय व अनुज्ञेय रजेची वैशिष्टये

## (१) अर्जित रजा – नियम ५०

३. प्रत्येक पूर्ण कॅलेंडर महिन्याना अडीच दिवस दराने ही रजा जमा केली जाते.

४. सेवेचा कॅलेडर महिना पूर्ण नसल्यास तो महिना सोडावयाचा असतो.

# देय व अनुज्ञेय रजेची वैशिष्टये

## (१) अर्जित रजा – नियम ५०

५. असाधारण रजा / अकार्य दिन / निलंबन या कालावधीसाठी १/१० या दराने ही रजा कमी केली जाते. मात्र १५ दिवसापेक्षा जास्त कपात करता येणार नाही.

६. रजेचे दिवस अपूर्णांकात असल्यास ते पुढील दिवसांशी पूर्णांकात केले जातात.

# देय व अनुज्ञेय रजेची वैशिष्टये

## (१) अर्जित रजा – नियम ५०

७. ही रजा कोणत्याही कारणास्तव घेता येते.

८. शक्यतोवर परिशिष्ट - ५ मधील नमुना – १ मध्ये या रजेसाठी अर्ज करावयाचा असतो.

९. रजा वेतन :- रजेवर जाण्यापूर्वीच्या दिवशी ज्या दराने वेतन आहरित केलं त्याच दराने संुपूर्ण रजा काळात “रजा वेतन” मिळेल. वेतनवाढ जरी रजा काळात आली तर वेतनवाढ मिळते परंतु प्रत्यक्ष लाभ रजा संपवून हजर झाल्यावर मिळेल.

# देय व अनुज्ञेय रजेची वैशिष्टये

## (२) अर्धवेतनी रजा

१. प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या जानेवारी आणि जुलै महिन्याच्या १ तारखेस प्रत्येकी १० दिवस याप्रमाणे दोन हप्त्यांमध्ये ही रजा आगाऊ जमा करण्यात येते.

२. ही रजा पूर्ण कॅलेंडर महिन्याना ५/३ या दराने जमा करण्यात येते.

# देय व अनुज्ञेय रजेची वैशिष्टये

## (२) अर्धवेतनी रजा

३. कॅलेंडर महिना पूर्ण नसल्यास तो महिना सोडावयाचा असतो.

४. अकार्य दिनाच्या कालावधीसाठी ही रजा १/१८ या दराने कमी केली जाते.

५. रजेचे दिवस अपूर्णांकात येत असल्यास ते नजीकच्या दिवसांत पूर्णांकित केले जातात.

६. ही रजा कोणत्याही कारणास्तव घेता येते.

# देय व अनुज्ञेय रजेची वैशिष्टये
## (२) अर्धवेतनी रजा

७. या रजेच्या साठवणुकीवर मर्यादा नाही.

८. या रजेसाठी विहित नमुन्यात अर्ज करावयाचा असतो.
(परिशिष्ट -५ नमुना -१)

९. रजा वेतन :- या काळात रजेवर जाण्यापूर्वीच्या दिवशी ज्या दराने वेतन आहरित केलं त्याच दराच्या ५०% वेतन व त्यावर आधारित महागाई भत्ता मिळतो मात्र, घरभाडे भत्ता व शहर पुरक भत्ता मागील महिन्याच्या दराने अनुज्ञेय.

# देय व अनुज्ञेय रजेची वैशिष्टये

## (३) परिवर्तीत रजा – नियम ६१

ही रजा वैद्यकीय प्रमाणपत्रावर खालील अटींच्या अधीन राहून मंजूर केली जाते.

१. कर्मचारी कामावर परत येण्याची रजा मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याची खात्री पटली पाहिजे.

२. पूर्णवेतनी रजेच्या स्वरूपात मंजूर केली जाते.

३. दुप्पट दिवस अर्धवेतनी रजेच्या खाती टाकले जातात.

४. कर्मचारी सेवेत परत न आल्यास या रजेचे रुपांतर अर्धवेतनी रजेत केले जाते व अति प्रदानाची रक्कम वसूल करण्यात येते.

# देय व अनुज्ञेय रजेची वैशिष्टये
## (३) परिवर्तीत रजा – नियम ६१

**ही रजा वैद्यकीय प्रमाणपत्रावर खालील अटींच्या अधीन राहून मंजूर केली जाते.**

**५. रजा वेतन - अर्जित रजेवर गेल्यावर मिळते त्याचदराने म्हणजे रजा वेतन अनुज्ञेय राहील.**

**५. अपवाद- खालील प्रकरणी ही रजा मंजूर करण्यासाठी वैद्यकीय प्रमाणपत्राची आवश्यकता नसते.**

**i. प्रसुती रजेला जोडून ६० दिवसांच्या मर्यादेपर्यंत बालसंगोपनासाठी**

**ii. लोकहितास्तव उच्च अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी ९० दिवसांपर्यंत.**

**iii. विपश्चनेसाठी १४ दिवसांपर्यंत, तीन वर्षातून एकदा/संपूर्ण सेवेत ६ वेळा**

# देय व अनुज्ञेय रजेची वैशिष्टये

## (३) परिवर्तीत रजा – नियम ६१

iv. शिक्षक संवर्गासाठी प्रत्येक सहामाहित त्यांना अनुज्ञेय १० दिवस अर्धवेतनी रजेएवढी ५ दिवस पूर्ण वेतनी रजा शासन निर्णय दि. ६/१२/९६ प्रमाणे घेता येईल. मात्र या रजेस अर्जित रजा असे संबोधले आहे.

# देय व अनुज्ञेय रजेची वैशिष्टये

## (४) अनर्जित रजा – नियम ६२

१. कोणतीच रजा शिल्लक नसल्यास ही रजा मंजूर करता येते. म्हणजेच हा रजेचा over draft आहे.

२. ही रजा अर्धवेतनी स्वरुपात मंजूर करता येते.

३. संपूर्ण सेवेच्या कालावधीत ३६० दिवसांपर्यंत ही रजा मंजूर करता येते.

४. एकावेळी वैद्यकीय प्रमाणपत्राखेरीज ९० दिवसांपर्यंत व वैद्यकीय प्रमाणपत्र धरून जास्तीत जास्त १८० दिवसांपर्यंत ही रजा मंजूर करता येते.

# देय व अनुज्ञेय रजेची वैशिष्टये

## (४) अनर्जित रजा – नियम ६२

५. ही रजा मंजूर केल्यानंतर जेवढी अर्धवेतनी रजा अर्जित होते त्या रजे मधून अनर्जित रजा वजा करता येते.

६. ही रजा मंजूर केल्यानंतर कामावर परत न आल्यास रजा वेतनाची वसुली केली जाते.

७. ही रजा फक्त सेवेत कायम असलेल्या कर्मचा-यांनाच मंजूर करता येते.

८. रजा वेतन :- अर्धवेतनी रजेप्रमाणे रजा वेतन या रजेत मिळते.

# देय व अनुज्ञेय रजेची वैशिष्टये

## (५) असाधारण रजा – नियम ६३

१. कोणतीही रजा अनुज्ञेय नसेल किंवा असताना देखील स्पष्टपणे असाधारण रजेची मागणी केली तरच ती रजा मंजूर करता येते.

२. कायम सेवेतील कर्मचाऱ्याला कोणत्याही प्रकारची रजा ०५ वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी मंजूर करता येत नाही.

३. अस्थाई कर्मचाऱ्यांना ही रजा खालील मर्यादेर्यंत मंजूर करता येते :-

४. कोणताही कर्मचारी - वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय ०३ महिन्यांपर्यंत.

# देय व अनुज्ञेय रजेची वैशिष्टये

## (५) असाधारण रजा – नियम ६३

५. तीन वर्षाच्या सेवेनंतर - वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे ०६ महिन्यांपर्यंत.

६. पाच वर्षाच्या सेवेनंतर - वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे १२ महिन्यांपर्यंत.

७. १ वर्षाच्या सेवेनंतर - कर्करोग, मानसिक रोग यासाठी - १२ महिन्यांपर्यंत.

८. १ वर्षाच्या सेवेनंतर - क्षयरोग, कुष्ठरोग यासाठी - १८ महिन्यांपर्यंत

९. ३ वर्षाच्या सेवेनंतर - लोकहितार्थ उच्च अभ्यासक्रमासाठी - २४ महिन्यांपर्यंत

# देय व अनुज्ञेय रजेची वैशिष्टये

## (५) असाधारण रजा – नियम ६३

१०. रजा वेतन : या रजमध्ये वेतन व महागाई भत्ता अनुज्ञेय नाही पण रजेवर जाण्यापुर्वी ज्या दराने घरभाडे भत्ता व स्थानिक भत्ता दिला जात होता ते मात्र घरभाड्यावर त्या मुख्यालयात कर्मचारी खर्च करतोय असे प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्यांना देणे गरजेचे आहे. शा. नि. दि. ४/९/२०००. याबाबतची खात्री सक्षम अधिकाऱ्याने करणे गरजेचे असून त्यांचे समाधान झाल्यावर सदर फायदा देता येईल.

# प्रसुती रजा

## (१) प्रसुती रजा / गर्भपात रजा - नियम ७४

१. महिला शासकीय कर्मचाऱ्यांना प्रसुती रजा खालीलप्रमाणे अनुज्ञेय ठरते :-

२. पुर्वशर्त : दोनपेक्षा कमी हयात मुले असावीत.

३. महिला कर्मचाऱ्यांना १८० दिवस. पूर्ण वेतनी रजेच्या स्वरुपात.

४. शासन निर्णय दि. १५/०१/२०१६ अन्वये स्थायी / अस्थायी महिला कर्मचाऱ्यांना पुर्ण वेतन अनुज्ञेय.

# (१) प्रसुती रजा / गर्भपात रजा - नियम ७४

५. अस्थायी महिला कर्मचाऱ्यांकडून सेवा समाप्तीनंतर दोन वर्षे सेवा करण्याची हमीपत्र लिहून घ्यावे.

६. याशिवाय शा. नि. २८/०७/१९९५ प्रमाणे या रजेस बालसंगोपनासाठी ६० दिवसांची परावर्तीत रजा व अनर्जित रजा किंवा अनुज्ञेय रजा धरुन १ वर्षापर्यंत मंजूर करता येईल. याशिवाय शासन निर्णय वित्त विभाग दि. २३/०७/२०१८ अन्वये महिला कर्मचाऱ्यांना दोन अपत्यांपर्यंत बालसंगोपनासाठी १८० दिवस रजा मिळणार आहे.

७. एका कॅलेंडर वर्षात दोन महिन्यापर्यंत जास्तीत जास्त घेता येईल.

# (१) प्रसुती रजा / गर्भपात रजा - नियम ७४

८. अपत्ये १८ वर्षाचे होईपर्यंतचही सवलत मिळेल. या काळात रजेवर जाण्यापुर्वीच्या दराने रजा वेतन मिळेल.

९. घरात पत्नी नसलेल्या किंवा पत्नी असाध्य रोगाने आजारी असल्यास पुरूष कर्मचाऱ्यांनाही रजा अनुज्ञेय आहे.

१०. विकलांग अपत्य असल्यास महिला कर्मचारी व पत्नी नसलेले पुरुष कर्मचारी हयांना संपुर्ण सेवेत ७३० दिवस विशेष रजा अनुज्ञेय (शा. नि. २१/९/२०१६)

# प्रसुती रजा

१. प्रसुती रजेच्या वरील अटी व शर्तींच्या अधीन राहून संपूर्ण सेवेच्या कालावधीत ४५ दिवस. परंतु दोन पेक्षा कमी हयात अपत्ये ही अट यासाठी लागू नाही.

२. दत्तक अपत्त्यासाठी रजा शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अरजा/ २४९५/ २६/ सेवा ९ दिनांक २६/१०/१९९८.

# प्रसुती रजा

३. मुल १ वर्षाचे आत असल्यास १८० दिवस

४. मुल १ वर्षाचे पुढे असल्यास ९० दिवस

५. स्वत:चे एक अपत्य असतानाही घेता येईल.

६. या रजेस जोडून बाल संगोपन अअ (ELसुद्धा) घेता येईल. शा. नि. वि. वि. १५/३/२०१७

# (२) विशेष विकलांगता रजा

## (अ) हेतूपुरस्पर झालेल्या इजेबद्दल – नियम ७५

१. पदाच्या कर्तव्याचे योग्य पालन करीत असताना त्याच्या परिणाम किंवा हेतुपुरस्पर झालेली इजा.

२. विकलांगता घटना उद्भवल्यापासून तीन महिन्याच्या आत उघड होणे आवश्यक.

३. तथापि सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटल्यास झालेला विलंब क्षमापित करता येतो.

४. रजा कोणत्याही एका विकलांगतेच्या परिणामी २४ महिन्यापेक्षा अधिक असता कामा नये.

# (२) विशेष विकलांगता रजा
## (अ) हेतूपुरस्पर झालेल्या इजेबद्दल – नियम ७५

### रजा वेतन

१. पहिल्या १२० दिवसांसाठी – अर्जित रजा वेतनाइतकी
२. उरलेल्या कालावधीसाठी – अर्धवेतनी रजेइतकी.
३. स्वेच्छेनुसार कर्मचारी आणखी जास्तीत जास्त १२० दिवसांच्या कालावधीसाठी अर्जित रजा वेतन घेऊ शकतो. अशावेळी रजा अर्धवेतनी रजेच्या खाती खर्ची

# (२) विशेष विकलांगता रजा

## (ब) अपघाती – नियम ७६

१. पदाच्या कर्तव्याचे योग्य पालन करताना / त्याच्या परिणामी इजा झाल्यास.

२. विकलांगता हि पदाच्या कर्तव्याच्या परिणामी झाल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने व प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याने प्रमाणित करणे आवश्यक.

३. रजेचा कालावधी जास्तीत जास्त २४ महिने

- रजा वेतन - पहिल्या १२० दिवसांसाठी - अर्जित रजा वेतनाएवढी

१. उरलेल्या कालावधीसाठी - अर्धवेतनी रजा वेतनाएवढी

# २) रुग्णालयीन रजा – नियम ७७

१. वर्ग - ४ चे कर्मचारी व यंत्रसामुग्री, स्फोटके द्रव्ये, विषारी औषधे हाताळणारे वर्ग -३ चे कर्मचारी यांनाच फक्त अनुज्ञेय असते.

- पदाची कर्तव्ये पार पाडत असताना
- रजेचा कालावधी जास्तीत जास्त २८ महिने

**रजा वेतन -**

१. पहिल्या १२० दिवसांसाठी - अर्जित रजा वेतनाएवढी

२. उरलेल्या कालावधीसाठी - अर्धवेतनी रजा वेतनाएवढी

# ४) क्षयरोग/कर्करोग/कुष्ठरोग/पक्षघात रजा नियम ७९ व परिशिष्ट -३

- ही रजा मंजूर करण्यासंबंधीचे नियम परिशिष्ट -३मध्ये नमूद करण्यात आले आहेत.
- नियम – १- व्याप्ती
- रोजंदारी /अंशकालीन कर्मचारी वगळून सर्व कर्मचाऱ्यांना लागू आहेत.
- स्थायी – सर्व सवलती अनूज्ञेय

# ४) क्षयरोग/कर्करोग/कुष्ठरोग/पक्षघात रजा नियम ७९ व परिशिष्ट -३

- **अस्थायी –**
  1. **तीन वर्षाची सेवा – सवलती अनुज्ञेय**
  2. **१ ते ३ वर्ष सेवा – आर्थिक व पूर्ण वेतनी क्षयरोग रजा सोडून इतर सवलती.**
  3. **एक वर्षापेक्षा कमी सेवा – कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही. (शासकीय इस्पितळातील मोफत उपचार सोडून)**

# ४) क्षयरोग/कर्करोग/कुष्ठरोग/पक्षघात रजा
## नियम ७९ व परिशिष्ट -३

- निलंबनाधीन कर्मचाऱ्यास वरीलप्रमाणे अनुज्ञेय.
- रजेसाठी तपासणी - मुंबई - जी.टी./ जे .जे. रुग्णालय
- अन्यत्र महाराष्ट्रात - जिल्हा शल्य चिकित्सालय किंवा नजीकचे शासकीय रुग्णालय.
- तपसणी खर्च आकारला जात नाही.

# क्षयरोग रजा मंजूरी

- प्रथम खात्यावर शिल्लक असलेली अर्जित रजा. तद्नंतर एक वर्षाच्या मर्यादेपर्यंत क्षयरोग रजा - तद्नंतर वैद्यकीय सल्ल्यानुसार असाधारण रजा. सर्व प्रकारच्या रजांच्या कालावधीची मर्यादा तीन वर्ष.

- सक्षम प्राधिकारी - प्रादेशिक अधिकारी / विभाग प्रमुख

# क्षयरोग रजा मंजूरी

- रजेवर असताना उपचार - शासकीय / खाजगी वैद्यकीय अधिकार
- कामावर रुजू होण्यासाठी वैद्यकीय तपासणी - वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र

# क्षयरोग रजा मंजूरी

- आर्थिक सवलत – विशेष आहार खर्च, विशेष औषधांचा खर्च, आरोग्यधामाचा खर्च
- दुसऱ्या / तिसऱ्या वेळी सवलती मंजूर करण्यास सक्षम प्राधिकारी –
- विभागप्रमुख – दुसऱ्यांदा
- शासन – तिसऱ्यांदा

# क्षयरोग रजा मंजूरी

- पुनर्नियुक्ती – वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्ती प्राधिकारी पुनर्नियुक्ती देऊ शकतात. प्रथम नियुक्तीच्या वेळी वैद्यकीय तपासणी झाली असल्यास पुनर्नियुक्तीच्या वेळी वैद्यकीय तपासणीची आवश्यकता नसते.पूर्वीच्या सेवा व वेतन संरक्षित केले आहे.

# क्षयरोग रजा मंजूरी

- कर्करोग / कुष्ठरोग/पक्षाघात झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना क्षयरोग सवलती लागू आहेत. तसेच शा. नि. दि. २०/०१/२००५ प्रमाणे एड्सग्रस्तांनाही सदर सवलत अनुज्ञेय केली आहे परंतु एचआयव्ही पॉझिटिव्ह यांना मात्र अनुज्ञेय नाही.

# क्षयरोग रजा मंजूरी

- क्षयरोग सवलती तीन हयात मुलांएवढे मर्यादेत असलेल्या कुटुंबाच्या कर्मचाऱ्यास अनुज्ञेय ठरतात. दि. २०/३/२००५ पासून शासनाने छोटया कुटुंबाची मर्यादा दोन हयात अपत्यांची संख्या विहित केली असल्याने या तारखेनंतर तिसरे अपत्य कुटुंबात वाढल्यास अशा कुटुंबातील कर्मचाऱ्यास सदर सवलत मिळणार नाही.

- सेवानिवृत्त सवलती बंद होतात.

- रजा वेतन :- अर्जित रजेप्रमाणे या रजा काळात पुर्ण दराने वेतन अनुज्ञेय.

# अध्ययन रजा

- कर्तव्यक्षेत्राशी संबंध असलेल्या विषयातील उच्च शिक्षण / पाठ्यक्रम भारतामध्ये किंवा भारताबाहेर पूर्ण करण्यासाठी
- कमीत कमी पाच वर्षांची सेवा
- रजा संपल्यावर कामावर परत येणे आवश्यक –कमीत कमी ३ वर्षे सेवा करणे गरजेचे आहे.
- हक्क म्हणून मागता येत नाही.
- एकाच व्यक्तीला वारंवार मंजूर करता येत नाही.

# अध्ययन रजा

- भारताबाहेरील अभ्यासक्रमासाठी अभ्यासक्रम भारतात उपलब्ध नसल्याने सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आवश्यक.
- अभ्यासक्रम/प्रशिक्षण लोकहिताच्या दृष्टीने निश्चित लाभदायक असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आवश्यक.
- रजा कालावधी १२ ते २४ महिने.

# रजा रोखीकरण – नियम ६५,६८,६९

## १. अर्जित रजेचे रोखीकरण खालीलप्रमाणे देय होते :-

- नियतवयमान/स्वेच्छा/मुदतपूर्व - रुग्णता निवृत्ती
- (३०० दिवसांच्या मर्यादेपर्यंत)
- सेवेत असताना मृत्यू
- (३०० दिवसांच्या मर्यादेपर्यंत)

## २. अर्धवेतनी रजेचे रोखीकरण खालीलप्रमाणे देय होते :-

- नियतवयमान – निवृत्ती
- (मर्यादा नाही)
- सुत्र

अर्धवेतनी रजेचे रोख सममूल्य = (मूळ अर्धवेतन + अनुज्ञेय असल्यास म.भ.) वजा (-)
(नि. वे. आणि इतर निवृत्ती लाभांचे नि. वे. सममूल्य आणि नि. वे वरील वाढ X शिल्लक असलेल्या अर्धवेतनी रजेचे दिवस) / भागीले ३०

# रजा रोखीकरण – नियम ६५,६८,६९

| | |
|---|---|
| ❖ राजीनामा दिल्यास ३०० दिवसापर्यंत रोखीकरण अनुदेय केले आहे. तत्पूर्वी शिल्लक रजेच्या ५०% रजेचे रोखीकरण करता येत होते. ही अट अधिसूचना दि. २४/०६/२०१६ अन्वये काढून टाकली. | |
| ❖ एक रकमी अअ अर्ज म.भ. नंतर वाढण्यास अनुज्ञेय नाही असे नाही फरक अनुज्ञेय. उदा. सहाव्या वेतन आयोगाची दि. १/१/२००६ ते दि. २२/४/२००९ पर्यंत सेवा निवृत्तीचा फरक देण्यास शा. नि. २७/८/२००९ अन्वये अनुज्ञेय सांगितले. | |

# रजा रोखीकरण – नियम ६५,६८,६९

| | |
|---|---|
| ❖सूत्र : अर्जित रजेचे रोख सममूल्य = मूळ वेतन + म.भ. X शिल्लक अर्जित रजेचे दिवस भागीले ३० | |
| टीप :- दि. ०१/०१/२००६ पासून मूळ वेतन म्हणजे वेतनबँड मधील वेतन अधिक (+) ग्रेड वेतन होय.<br><br>टीप :- पुनर्नियुक्त कर्मचाऱ्यांना वरीलप्रमाणे रोखीकरण अनुज्ञेय | |

# किरकोळ रजा

१. रजेचा प्रकार नाही. पूर्व परवानगी आवश्यक.

२. कर्तव्य काळातून दिलेली तात्पुरती सूट.

३. वर्षाच्या ८ दिवस अनुज्ञेय.

४. सार्वजनिक सुट्टीस जोडून / अधेमधे घेता येईल.

५. सार्वजनिक सुट्टीस जोडून सलग ७ दिवसांपेक्षा जास्त काळ घेता येत नाही.

६. सेवा पुस्तकात नोंद नाही / स्वतंत्र नोंदवहीत हिशोब ठेवणे.

शासन निर्णय वित्त विभाग
१. एलव्हिइ १४८२ सीआर ९०/एसईआर ९ दि. २४/३/१९८२
२. ने.मि.र./प्र.क्र.५२/९८ सेवा — ९ दि. २१/१२/१९९८.

# मोबदला सुट्टी

१. निम्नश्रेणी कर्मचाऱ्यांनी सार्वजनिक सुट्टी मध्ये केलेल्या कामाचा मोबदला सुट्टी.

२. एका कॅलेंडर वर्षात एका वेळी तीन पेक्षा जास्त साठवता येत नाही.

३. पुढील कॅलेंडर वर्षात उपयोगात आणता येणार नाही.

४. जादा कामाचा आर्थिक फायदा दिल्यास मोबदला सुट्टी अनुज्ञेय नाही.

शा. नि. साप्रवि/क्र.पी १३/१३९७/वी/दि.१६/०७/१९६४

# विशेष किरकोळ रजा

१. कुटुंब नियोजनास प्रोत्साहन.

२. सेवा पुस्तकात नोंद घेणे.

३. पुरुष कर्मचाऱ्यांना स्वत:वरील कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेस ०६ दिवस.

४. पहिला प्रयत्न अयशस्वी झाल्यास दुसऱ्या वेळेस ६ दिवस.

कृपया शासन निर्णय वित्त विभाग क्र. एलव्हिइ/१४८०/सीआर १३९९/एसईआर ९ दिनांक १४/०७/१९८१ पहावा.

# विशेष किरकोळ रजा

५. पत्नीच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेदरम्यान, देखभालीसाठी पुरुष कर्मचाऱ्यांना ०७ दिवस.

६. महिला कर्मचाऱ्यांना प्रसुती व्यतिरिक्त इतर वेळी किंवा कायदेशीर गर्भपातानंतर शस्त्रक्रिया केल्यास १४ दिवस.

७. संतती प्रतिबंधक उपकरण बसविण्यासाठी एक दिवस

कृपया शासन निर्णय वित्त विभाग क्र. एलव्हिइ/१४८०/सीआर १३९९/एसईआर ९ दिनांक १४/७/८१ पहावा.

# धन्यवाद...